**aआकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०१ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **ओडिशात भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत समारोप.**
2. **एचआयव्ही एड्स बाधित व्यक्तींच्या मानवी हक्कांचं संरक्षण करण्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांचं आवाहन.**
3. **उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान महाकुंभ मेळ्याचं आयोजन; सुमारे ४३ कोटीं भाविक होणार सहभागी.**
4. **आपली संस्कृती एका भाषेपुरती आणि जातीपुरती मर्यादित नसून ती सर्वांची असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचं प्रतिपादन.**
5. **महाराष्ट्रातील नवनिर्वाचित महायुती सरकारचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबईच्या आझाद मैदानावर नियोजित.**

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-भुवनेश्वर**

**ओडिशात भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत समारोप होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते परिषदेचं २९ तारखेला उद्घाटन करण्यात आलं होतं. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलिस महासंचालक, तसंच केंद्रीय राखीव पोलिस बल, रॉ, राष्ट्रीय सुरक्षा दल - एनएसजी, गुप्तचर विभाग आणि विशेष सुरक्षा दल-एसपीजीचे प्रमुख या परिषदेला उपस्थित आहेत. नवे फौजदारी कायदे, दहशतवाद आणि नक्षलवादाला प्रतिबंध, किनारी सुरक्षितता, अमली पदार्थांची तस्करी, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर गुन्हेगारी आणि ड्रोनसारख्या तंत्रज्ञानामुळं निर्माण होणारी आव्हानं यासह राष्ट्रीय सुरक्षिततेसंदर्भात महत्वपूर्ण बाबींवर या परिषदेत चर्चा होत आहे.**

---

## जागतिक एड्स दिन

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी सामान्य लोकांना एचआयव्ही एड्स बाधित व्यक्तींबद्दल संवेदनशीलता दाखवावी आणि संक्रमित व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण करावे असं आवाहन केलं आहे . मध्य प्रदेशातील इंदूर इथं आज जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना ते म्हणाले की, केंद्र सरकारने एचआयव्ही संरक्षण कायदा 2017 च्या माध्यमातून बाधित व्यक्तींसोबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव थांबवण्याचं काम केलं आहे. केंद्र सरकारने चाचणी आणि उपचार धोरणाची अंमलबजावणी सुरू केल्यामुळे आता देशात एड्समुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये 79 टक्के घट झाली असल्याचंही नड्डा म्हणाले. “सही रास्ते पर चले” ही या वर्षीच्या एड्स दिवसाची संकल्पना आहे. एच. आय. व्ही. बद्दल जागरुकता वाढवणं, उपचारासाठी अधिकार-आधारित दृष्टीकोनाला चालना देणं तसंच एचआयव्हीने प्रभावित लोकांविरुद्ध भेदभाव संपवणं या उद्देशानं आज देशभरात अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून ‘मार्ग हक्काचा, सन्मानाचा’ या घोषवाक्यावर आधारीत चंद्रपूर जिल्हयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज विविध सामाजिक संस्था, महाविद्यालय यांच्या सहकार्याने जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी अतिरीक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.भास्कर सोनारकर यांनी एडस् विरोधी शपथेच वाचन केल.

---

## कुंभमेळा

उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान महाकुंभ मेळा होणार असून ४३ कोटींहून अधिक भाविक या सोहळ्याला हजेरी लावतील अशी अपेक्षा आहे. या भाविकांच्या सुविधेसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशातल्या रस्ते आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. ६३ पूर्णांक १७ शतांश किमी लांबीच्या रायबरेली-प्रयागराज राष्ट्रीय महामार्गाचं रुंदीकरण, चार ठिकाणी चौपदरी बायपास, प्रयागराज इनर रिंग रोड यासह अनेक प्रकल्पांचा आढावा यावेळी घेतला गेला.

---

## ईव्हीएम

विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये फेरफार झाल्याचा दावा करणारी एक ध्वनीचित्रफित समाजमाध्यमांवर फिरत आहे. या ध्वनिचित्रफितीतल्या

व्यक्तीविरोधात मुंबई पोलीसांच्या सायबर विभागाने गुन्हा दाखल केला आहे. याबाबत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने तक्रार दाखल केली होती. गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीने आपल्या ध्वनीचित्रफितीत इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रामध्ये फेरफार करून ते हॅक केल्याचा केलेला दावा खोटा आणि तथ्यहीन असल्याचंही राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं म्हटलं आहे. या तक्रारीच्या आधारे या व्यक्तिविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३, तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० या अंतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं समाजमाध्यमावरच्या निवेदनातून दिली.

---------------------------------------

अग्निवीर

अहमदनगर इथं आज ३८६ रक्षक अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीचा प्रमाणपत्र समारंभ पार पडला. यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या अग्निवीरांसाठी हा कार्यक्रम एक मैलाचा दगड ठरला. देशसेवेच्या अविरत कार्यात रुजू होणाऱ्या या अग्निविरांच्या प्रशिक्षण पूर्ती कार्यक्रमाला वरिष्ठ अधिकारी आणि अग्निवीरांचे कुटुंबीय उपस्थित होते.

---------------------------------------

मोहन भागवत

आपली संस्कृती एका भाषेपुरती आणि जातीपुरती मर्यादित नाही, ती सर्वांची आहे. हिंदू धर्म आज नाव असले तरी हे नाव फार नंतर दिलं गेलेलं आहे. त्यापूर्वी केवळ मानवधर्म होता. आपल्याला सर्व मानव समसमान आहे, याची जाणीव खूप आधी झाली होती. मात्र गेल्या दीडशे वर्षात संकुचित वृत्ती वाढत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं. ते आज नागपूर इथं एका कार्यक्रमात बोलत होते.

*ही आपली संस्कृती ही एका भाषेपूर्ती मर्यादित नाही, ती एका जातीपूर्ती मर्यादित नाही, ती एका क्षेत्रापूर्ती मर्यादित नाही. छोटे छोटे तपशील देश काल परिस्थितीनुसार बदलत असतात. परंतु ही संस्कृती ही सगळ्यांची एक आहे. निव्वळ उपभोगाकरिता, केवळ मनाच्या प्रसन्नते करता, केवळ बुद्धीच्या जिज्ञासेच्या शांती करता नाही जगायचं, तर त्याच्या पलीकडे आपल्याला जोडणारं एक सूत्र सगळीकडे आहे ते कोणत आहे, ते मिळालं पाहिजे, त्यात खर सुख आहे, त्यात संतोष आहे, समाधान आहे हे, जाणणारी आपली संस्कृती आहे. साध्या साध्या छोट्या आचारातून हे प्रत्येकाला देणारी आपली संस्कृती आहे.*

जातीपातींना शास्त्रात स्थान नाही, तरीही जातीभेद सुरूच आहेत, असंही भागवत यावेळी म्हणाले. लोकसंख्येच्या दरात होत असलेली घट चिंतेचा विषय आहे. सांखिकीच्या नियमानुसार लोकसंख्येचा वृद्धीदर 2.1 पेक्षा कमी नसावा. आधुनिक लोकसंख्या विज्ञानानुसार, जेव्हा एखाद्या समाजाचा प्रजनन दर 2.1 टक्क्यांपेक्षा पेक्षा कमी होतो, तेव्हा तो समाज जगातून नष्ट होतो. त्यामुळे लोकसंख्येच्या दरात होत असलेली घट चिंतेचा विषय आहे, असं मोहन भागवत यावेळी म्हणाले.

---------------------------------------

शपथविधी

महाराष्ट्रातील नवनिर्वाचित महायुती सरकारचा बहुप्रतिक्षित शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबईच्या आझाद मैदानावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप, शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा समावेश असलेल्या महायुतीने २८८ पैकी २३० जागा मिळवल्या. विक्रमी १३२ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ५७ जागा जिंकल्या. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागा मिळाल्या.

---------------------------------------

स्कॉच पुरस्कार

“शासन आपल्यादारी” या उपक्रमाला प्रतिष्ठीत स्कॉच पुरस्कार आज प्रदान करण्यात आला. देशभरातील विविध श्रेणीतील २८० प्रकल्पांमधून “शासन आपल्या दारी” च्या महाराष्ट्राच्या मॉडेलची निवड करण्यात आली. शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवून त्याचे जीवन सुखकर करण्यासाठी हा उपक्रम मुख्यमंत्री जनकल्याण कक्षान वर्षभर यशस्वीरीत्या राबवून पाच कोटींहून अधिक लाभ नागरिकांच्या दारी पोहचविले आहे. मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे प्रमुख डॉ. अमोल शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

---------------------------------------

बुडून मृत्यू

काल वैनगंगा नदीवर फिरायला गेलेली चार शाळकरी मुले खोल पाण्यात बुडाली. यातील एका मुलाचा मृत्यू झाला, तर तिघांना वाचविण्यात यश आलं आहे. जयंत आझाद शेख वय १० वर्षे असं मृत विद्यार्थ्यांचं नाव आहे. ही ४ मुले काल दुपारी शहरापासून चार किलोमीटर अंतरावरील वैनगंगा नदीच्या बोरमाळा घाटावर फिरायला गेली होती. मौज म्हणून चारही मुले पाण्यात उतरली. परंतु खोल पाण्याचा अंदाज न आल्याने सर्व जण बुडाली. त्यांनी आरडाओरड करताच काठावर बसलेल्या ताजू शेख यांनी हिंमत करुन पाण्यात उडी घेतली. त्यांनी तिघांना पाण्याबाहेर काढले परंतु जयंत शेख हा प्रवाहात वाहून गेल्याने त्याला बाहेर काढता आलं नाही.

---------------------------------------

हवामान

विदर्भातील किमान तापमानात किंचित वाढ झालेली आहे. मागील 24 तासांत विदर्भात सर्वात कमी किमान तापमान गडचिरोली इथं 13 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलं. चंद्रपूर इथं 13 पूर्णांक पाच अंश तर गोंदिया इथं 16 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान राहिलं. नागपुरात किमान तापमानात बरीच वाढ दिसून आली असून मागील 24 तासांत नागपुर इथं किमान तापमान 18 पूर्णांक पाच अंश सेल्सिअस तर कमाल तापमान 30 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस नोंदविण्यात आलं आहे. दरम्यान, प्रादेशिक हवामान विभागाने उद्या यवतमाळ आणि गडचिरोली इथं तुरळक पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्याचप्रमाणे मंगळवार दिनांक 3 डिसेंबर रोजी वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली इथं तुरळक पाऊस पडू शकतो. दरम्यान, आज सकाळपासून नागपुरात ढगाळ वातावरण आहे.

*****